आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

६ ऑक्टोबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची उद्या नवी दिल्लीत केंद्रीय गृह मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक
- मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुइज्जू पाच दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी दिल्लीत दाखल
- ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांची निवड
- मराठी चित्रपटसृष्टीतल्या पहिल्या बाल अभिनेत्री वासंती घोरपडे-पटेल यांचं निधन

  **आणि**
- महिला टी- ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर सहा गडी राखून विजय

**<><><><><>**

देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक उद्या नवी दिल्ली इथं केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगणा, ओदिशा, आणि मध्य प्रदेश, या राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित राहतील.

या राज्यांना विकास निधी प्रदान करण्यात सक्रीय सहभाग असलेले पाच केंद्रीय मंत्री देखील या बैठकीला उपस्थित राहतील. तसंच उप राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि केंद्र, राज्ये आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी देखील या चर्चेत सहभागी होतील.

**<><><><>**

क्वाड समूह संस्थात्मक सहकार्याच्या सर्व पारंपरिक पद्धतींना छेद देत असून त्यामुळेच क्वाडची कार्यपद्धती नाविन्यपूर्ण आहे, असं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत सुरू असलेल्या कौटिल्य अर्थशास्त्र परिषदेत ते आज बोलत होते. क्वाड ही हिंद प्रशांत क्षेत्रातली एक महत्वाची यंत्रणा आहे, असं ते म्हणाले. भारत जगभरातल्या बहुतेक सर्व राष्ट्रांशी जोडला गेला असून जागतिक राजकारणाकडे अधिक जबाबदारीने बघणारा देश म्हणून भारताची ओळख आहे, असं त्यांनी सांगितलं. संयुक्त राष्ट्र संघटनेत कालानुरूप बदल होणं आवश्यक आहे, असं मतही त्यांनी व्यक्त केलं.

**<><><><>**

जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी येत्या मंगळवारी होणार असून मतमोजणी सुरळीत पार पडण्यासाठी सर्व केंद्रावर कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू काश्मीरमध्ये होणारी ही पहिलीच निवडणूक आहे.

हरियाणामध्ये, वेगवेगळ्या जिल्ह्यांतल्या स्ट्राँग रूममध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली आणि कडक सुरक्षा व्यवस्थेत मतदान यंत्रं ठेवली आहेत. मतमोजणीच्या दिवशी निवडणूक अधिकारी, उमेदवार आणि निरीक्षकांच्या उपस्थितीत स्ट्राँग रूम उघडली जातील.

**<><><><>**

मालदीवचे राष्ट्रपती डॉ मोहम्मद मुइज्जू यांचं नवी दिल्लीत आगमन झालं. ते आजपासून पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. नवी दिल्ली विमानतळावर केंद्रीय मंत्री किर्ती वर्धन सिंह यांनी त्यांचं स्वागत केलं. या दौऱ्यात ते राष्ट्रपती

द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहेत. त्याचबरोबर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी, तसंच परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांच्याशी द्विपक्षीय, प्रादेशिक आणि परस्पर हिताच्या आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरदेखील ते चर्चा करणार आहेत. मुइज्जू यांच्या या भारत दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधल्या द्विपक्षीय संबंधांना चालना मिळेल असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं आहे.

मुईज्जू या दौऱ्यात आग्र्याला भेट देणार असून बंगळुरू आणि मुंबई इथं विविध कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

मुंबईत कांदिवली इथं 'नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स'च्या स्थापनेसाठी महाराष्ट्र सरकार आणि भारतीय क्रीडा प्राधिकरण यांच्यातल्या महत्त्वपूर्ण सामंजस्य करारावर आज स्वाक्षरी झाली. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत हे करार करण्यात आले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार जागतिक क्रीडा स्पर्धांमध्ये भारताची कामगिरी सुधारण्यासाठी कठोर परिश्रम करत असल्याचं गोयल यांनी सांगितलं. २०३६ साली होणारं ऑलिम्पिक भारतातच होईल, तसंच त्या ऑलिम्पिकमध्ये नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रस्तावित सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये खेळाडूंकरता आधुनिक वातानूकुलित वसतिगृह, ॲथलीट्ससाठी सेंट्रल किचन आणि डायनिंग, आंतरराष्ट्रीय दर्जाचं नवीन आधुनिक हॉकी टर्फ, मल्टीपर्पज स्पोर्ट्स हॉल इत्यादींचा समावेश असेल.

**<><><><><>**

नवी दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहितियिक, संशोधक आणि लोक साहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांची निवड झाली आहे. महामंडळाच्या आज पुण्यात झालेल्या बैठकीत डॉ. तारा भवाळकर यांची निवड झाल्याचं घोषीत करण्यात आलं.

हा लोकसंस्कृती आणि स्त्री विचारांचा आविष्कार तसंच त्याअनुषंगानं चळवळ करणाऱ्या सर्वांचा हा सन्मान आहे, अशी भावना तारा भवाळकर यांनी व्यक्त केली.....

**होल्ड - बाईट--तारा भवाळकर**

१९३९ मध्ये पुण्यात जन्मलेल्या तारा भवाळकर यांनी त्यांचं संपूर्ण आयुष्य लोकसाहित्याचं अध्ययन, चिंतन, संशोधन आणि लेखनासाठी समर्पित केलं. आजवर त्यांचे ३६ पेक्षा अधिक ग्रंथ प्रकाशित झाले असून ३२ पेक्षा अधिक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं आहे. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, मराठी भाषा आणि साहित्य, नाट्यपरंपरा अशा विविध विषयांत त्यांनी मोलाची भर घातली आहे. ललित लेखन, अनुवाद, व्याख्यानं, आकाशवाणीसाठी लेखन, यासह मराठी विश्वकोश, समाजविज्ञान कोश, मराठी वाङ्मयकोश, आणि ग्रंथकोश यातल्या अनेक महत्त्वाच्या नोंदी त्यांनी लिहिल्या आहेत.

**<><><><><>**

मराठी चित्रपटसृष्टीतली पहिली बाल अभिनेत्री आणि पहिली बालगायिका वासंती घोरपडे-पटेल यांचं आज हैदराबाद इथं वार्धक्यानं निधन झालं. त्या १०१ वर्षांच्या होत्या.

१९३५ मधे प्रभात कंपनीच्या ‘धर्मात्मा’ चित्रपटातून त्यांनी रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं. त्यानंतर ‘कुंकू’ चित्रपटात नायिका शांता आपटे यांच्या सोबत ‘भारती

सृष्टीत सौंदर्य खेळे’ तसंच ‘अहा भारत विराजे’ ही त्यांनी गायलेली आणि त्यांच्यावर चित्रित झालेली गाणी रसिकांची दाद मिळवून गेली. **‘अमरज्योती’,** ‘संत तुलसीदास’, ‘अछूत’, ‘दिवाली’, ‘मुसाफिर’, ‘बेटी’, ‘दुःखसुख’, ‘आपकी मर्जी’, ‘भक्तराज’, ‘भाग्यलक्ष्मी’ अशा मराठी आणि हिंदी चित्रपटांमधून त्यांनी काम केलं.

‘शारदा’ या संगीत नाटकातही त्यांनी काम केलं होतं. खाँसाहेब धम्मनखाँ आणि पंडित वामनराव सडोलीकर यांच्याकडे त्यांनी शास्त्रीय संगीताचं शिक्षण घेतलं होतं. त्यांच्या सुमारे २०० गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध झाल्या होत्या. वामनराव सडोलीकर प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार त्यांना मिळाला होता.

**<><><><><>**

दुबई इथं सुरू असलेल्या महिला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारतानं पाकिस्तानवर ६ गडी राखून विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पाकिस्ताननं निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून १०५ धावा केल्या. भारतानं ४ गड्यांच्या मोबदल्यात ही धावसंख्या पार केली. स्मृती मंधना आज लवकर बाद झाली. पण शेफाली वर्मा आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांनी डाव सावरला. शेफालीनं ३२, तर जेमिमानं २३ धावा केल्या. कर्णधार हरमनप्रितनं २९ धावांंचं योगदान दिलं, मात्र जायबंदी झाल्यामुळे तिला तंबूत परतावं लागलं. भारतानं सामन्यातले सात चेंडू बाकी असतानाच विजयी लक्ष्य पार करत १०८ धावा केल्या.

भारतातर्फे ३ बळी मिळवणारी अरुंधती रेड्डी सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**<><><><><>**

भारत आणि बांगलादेश यांच्यात ग्वाल्हेर इथं सुरु असलेल्या पहिल्या टी-20 क्रिकेट सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. बांगलादेशाचे सलामीचे फलंदाज झटपट बाद झाले. परवेझ हुसेन ईमॉन ८ धावांवर असताना अर्शदीप सिंगनं त्याचा त्रिफळा उडवला, तर लिट्टन दास ४ धावांवर असताना अर्शदीपच्या चेंडूवर त्याचा झेल रिंकू सिंगनं घेतला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा बांगलादेशाच्या १३ षटकात ६ बाद ९० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

मलेशियात होणाऱ्या बाराव्या सुल्तान ऑफ जोहोर चषक हॉकी स्पर्धेसाठी भारताचा पुरुष ज्युनियर संघ जाहीर झाला आहे. या संघाचा कर्णधार अमिर असून उप कर्णधार रोहित असेल. तर  पी आर श्रीजेश हे मुख्य प्रशिक्षक असतील. भारतीय संघाचा पहिला सामना १९ ऑक्टोबर रोजी जपानशी होणार असून भारतीय संघ दुसऱ्या दिवशी ब्रिटनशी लढत देईल. २२ ऑक्टोबरला मलेशिया आणि २३ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाच्या संघाशी भारतीय संघाचा सामना होणार आहे.

**<><><><><>**

मालाड इथं वीर सावरकर चौकात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्या हस्ते आज झालं. यावेळी माजी खासदार गोपाळ शेट्टी उपस्थित होते.

गोयल यांनी आज मुंबईच्या मालाड परिसरातल्याच मिठ चौकी इथं मार्वेला पश्चिम द्रुतगती महामार्गाला जोडणाऱ्या उड्डाणपुलाचंही आज उद्घाटन  केलं. मार्वे ते

गोरेगावपर्यंत विस्तारित उड्डाणपुलाची दुसरी बाजू डिसेंबरअखेर कार्यान्वित होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे.

**<><><><><>**

भारतीय हवाई दलाच्या ९२ व्या वर्धापन दिनाच्या निमित्तानं, ८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या उत्सवाची सुरुवात आज चेन्नईच्या मरिना समुद्र किनाऱ्यावर ७२ लढाऊ विमानं आणि हेलिकॉप्टरच्या भव्य प्रदर्शनानं झाली.